प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'ए ते आय' मधील बांधकाम विभागा अंतर्गत विविध विकास कामे करणे करीता लेखाशिर्षच्या खालील तरतुद संपल्याने कामाची देयके अदा करणेस व नविन प्रस्तावित कामे करणेस अडचणी निर्माण झालेली आहे. लेखाविभागातुन शिल्लक तरतुदीची आकडेवारी बांधकाम विभागाला दिलेली आहे..

सदर विविध विकास कामे करणे करीता व प्रलंबित देयके अदा करणेसाठी सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात खालील नमुद केलेल्या विहित नमुन्यात तरतुदीचे पुर्न:विनोयजन करुन देणे आवश्यक आहे.

ह्या लेखाशिर्षातुन (रु. लाखात)								ह्या लेखाशिर्षात (रु. लाखात)					
अ. क्र	लेखाशिर्ष	मुळ तरतुद	आजच्या तारखेपर्यंतचा झालेला खर्च/ प्रस्तावित खर्च	शिल्लक रक्कम	वर्ग करावयाची रक्कम	उपलब्ध शिल्लक	लेखाशिर्ष	मुळ तरतुद	आजच्या तारखेपर्यंतचा झालेला खर्च/ प्रस्तावित खर्च	**शिल्लक तरतूद**	प्रस्तावित वाढीची रक्कम	**उपलब्ध शिल्लक रक्कम**	अभिप्राय
१	शहरांतर्गत उड्डाणपूल	रु. ९७९.३९ लक्ष	निरंक	रु. ९७९.३९ लक्ष	रु. १०३.०० लक्ष	रु. ८७६.३९ लक्ष	विकास निधी अंतर्गत नाट्यगृहे सभागृह बांधकाम	रु. ३५३.१७ लक्ष	रु. ३५२.९२ लक्ष	रु. ०.२५ लक्ष	रु. १०३.०० लक्ष (पुनर्विनियोजन अंती तरतुद रु. ४५६.१७ लक्ष)	रु. ४५६.१७ लक्ष	-

तरी वरीलप्रमाणे सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता **''शहरांतर्गत उड्डाणपूल''** या लेखाशिर्षातून **''विकास निधी अंतर्गत नाट्यगृहे सभागृह बांधकाम करणे''** या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम **रु. १०३ लक्ष (पुनर्विनियोजन अंती तरतुद रु. ४५६.१७ लक्ष)** तरतुद वर्ग करुन मिळण्यास सदरचा विषय मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मंजूरीस्तव सविनय सादर.

ठराव :- प्रस्तावाचा मजकूर पाहता वाढीव तरतुदीची आवश्यकता असल्याने सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता **''शहरांतर्गत उड्डाणपूल''** या लेखाशिर्षातून **''विकास निधी अंतर्गत नाट्यगृहे सभागृह बांधकाम करणे''** या लेखाशिर्षा अंतर्गत **रु. १०३ लक्ष (पुनर्विनियोजन अंती तरतुद रु. ४५६.१७ लक्ष)** तरतुद वर्ग करुन सोबत जोडलेल्या नमुना नं. १० मधील लेखाशिर्षाच्या तरतुदीच्या पुनर्विनियोजनास मंजूरी देण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

नमुना क्रमांक १०
नियम ३० (३) पहा
वसई विरार शहर महानगरपालिका
पुनर्विनियोजन विवरणपत्र

ह्या लेखाशिर्षात (रु. लाखात)													
अ. क्र	लेखाशिर्ष	मुळ तरतुद	आजच्या तारखेपर्यंतचा झालेला खर्च	शिल्लक रक्कम	वर्ग करावयाची रक्कम	उपलब्ध शिल्लक	लेखाशिर्ष	मुळ तरतुद	आजच्या तारखेपर्यंतचा झालेला खर्च	शिल्लक तरतूद	प्रस्तावित वाढीची रक्कम	उपलब्ध शिल्लक रक्कम	अभिप्राय
१	शहरांतर्गत उड्डाणपूल	रु. ९७९.३९ लक्ष	निरंक	रु. ९७९.३९ लक्ष	रु. १०३.०० लक्ष	रु. ८७६.३९ लक्ष	विकास निधी अंतर्गत नाट्यगृहे सभागृह बांधकाम	रु. ३५३.१७ लक्ष	रु. ३५२.९२ लक्ष	रु. ०.२५ लक्ष	रु. १०३.०० लक्ष (पुनर्विनियोजन अंती तरतुद रु. ४५६.१७ लक्ष)	रु. ४५६.१७ लक्ष	-

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार पूर्व, जिल्हा-पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 2213

विभाग - सामान्य प्रशासन
दिनांक - 02/02/2026

प्रस्तावाचा विषय - **वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील तलाव ठेका पद्धतीने मत्स्यसंवर्धनासाठी देणेकाम ई-निविदा पसिद्ध करणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्तावाचा मजकुर - सादर करणेंत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील **३८ तलाव लिलाव प्रक्रिया पुर्ण करुन मत्स्यसंवर्धनासाठी ठेका पद्धतीने दिले जात होते.**

सदर ३८ तलावांपैकी **२ तलाव** हे ई-निविदा पद्धतीने **दि. १ जुन २०२२ ते दि. ३१ मे २०२४ (२४ महिने) या कालावधीकरिता ठेका पद्धतीने देण्यात आलेले होते.** तसेच **११ तलाव** हे दरपत्रक पद्धतीने **दि. ०१ जुलै २०२१ ते दि. ३१ मार्च २०२४ (३३ महिने) देण्यात आलेले** असून **९ तलाव** हे **दि. ०१ जुन २०२१ ते दि. ३१ मे २०२४ (३६ महिने) या कालावधीकरिता ठेका पद्धतीने देण्यात आलेले होते.** सदर तलावांची मुदत संपुष्टात आल्याने मा.आयुक्त सो. यांच्या मान्यतेने दि. २४/०९/२०२५ रोजी वरील **सर्व २२ तलावांची** दरपत्रके/ई-निविदा प्रसिद्ध करुन निविदा/दरपत्रके मागविण्यात आली होती. पंरतु प्रथम, द्वितीय फेर निविदा/दरपत्रके प्रसिद्ध करुनसुद्धा मुदतीत **एकही निविदाधारक/दरपत्रकधारकांनी तलावांच्या निविदांमध्ये सहभाग नोंदविलेला नाही.**

याबाबत मागील तलावांच्या मंजुर ठेकेदारांशी चर्चा करणेंत आली असता, **तलावांच्या निविदा रक्कमेमध्ये महानगरपालिका स्थापनेपासून ते सन २०१९ पर्यंत एकुण २ किंवा ३ वर्षांसाठी एकदाच १०% वाढ करण्यात येत होती. परंतु सन २०२२ ते २०२४ या कालावधीमध्ये सदर तलावांच्या रकमेमध्ये प्रती वर्षी १०% अशी वाढ करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने तलावांची भौगोलिक स्थिती पाहता, तलावांच्या आकारमानामध्ये वाढ न होता, तलाव आकाराने लहान होत आहेत. तसेच सदरचे तलाव फेब्रुवारी व मार्च या महिन्यामध्ये पुर्णपणे सुकुन जातात. त्या कालावधीत मत्स्यपालन करणे शक्य नसते. तसेच प्रभाग समिती (ई) मधील बहुतांश तलाव हे शेततळयासारखे असून सदर तलाव पानफुटीने भरुन गेलेली आहेत. या तलावांची गेले कित्येक वर्ष ठेकेदाराकडूनच साफसफाई करुन मासेमारी केली जाते.**

सन २०१९ ते २०२१ या कालावधीमध्ये अतिवृष्टीमुळे सदर तलाव भरुन जाऊन मत्स्यबीज वाहून गेले होते. तरीदेखील सन २०२२ ते सन २०२४ या कालावधीत एकुण २२ तलावांच्या निविदाप्रक्रियेस सहभाग नोंदवून ठेका पद्धतीने तलाव मत्स्यसंवर्धनासाठी घेण्यात आले होते. परंतु आता पुन:श्च सन २०२५ ते २०२८ या तीन वर्षांच्या कालावधीकरिता प्रती वर्षी १०% वाढ करुन निविदा प्रसिद्ध केल्याने तलावांच्या रकमेमध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे आम्हांस सदरचे तलाव या वाढीने घेणे शक्य होत नसल्याने आम्ही या निविदा प्रकियेमध्ये सहभाग नोंदविलेला नाही. त्या अनुषंगाने दि. २८/०७/२०२५ रोजी सर्व ठेकेदारांनी प्रभाग समिती (ई) मध्ये पत्र सादर केलेले आहे.

उक्त प्रमाणे प्रस्तावात नमुद सन २०२२ ते सन २०२४ या कालावधीत निविदा मंजुर झालेले २२ तलाव वगळता २ तलाव हे सुशोभिकरणासाठी देण्यात आलेले आहेत त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे.

१) **विमल तलाव :-** सदरचे तलाव बांधकाम विभागामार्फत सुशोभिकरण करण्यात येत असल्याने निविदा प्रसिद्ध करण्यात येत नाही.

२) **नाळे मोठा तलाव :-** सदर तलावाचा प्रस्ताव बांधकाम विभागाकडून अमृत-२ योजनेकरिता शासनाकडे पाठविण्यात आलेला असल्याने सदर तलावाकरिता निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली नाही.

उर्वरित १४ तलावांच्या निविदा प्रक्रियेबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ) प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील **कोरलमान, कोरला, तळपा, खुटलई हे तलाव मत्स्यसंवर्धनकामी देणेकामी सदर ४ तलावांची** दि. १८/०१/२०२१ रोजी जाहिर दरपत्रक सुचना प्रसिद्ध करुन दरपत्रके मागविण्यात आली परंतु मुदतीत एकही दरपत्रक प्राप्त झालेले नाही. तद्नंतर ३ वेळा दरपत्रके मागविण्यात आली. परंतु मुदतीत एकही दरपत्रके प्राप्त झालेली नाहीत. तद्नंतर दि. २९/०१/२०२१ रोजी फेर जाहिर दरपत्रक सुचना प्रसिद्ध करण्यात आली. यावेळी सुद्ध एकही दरपत्रक प्राप्त झालेले नाही. पुनःश्च दि. ११/०२/२०२१ रोजी द्वितीय फेर जाहिर दरपत्रक सुचना प्रसिद्ध करण्यात आली. यावेळी सुद्धा एकही दरपत्रक प्राप्त झालेले नाही.

ब) प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील **मराळे, कुक्कुटसार, सातारी, जोसोडी, उसारा या ५ तलावांची** ११/०२/२०२१ रोजी जाहिर दरपत्रक सुचना प्रसिद्ध करुन दरपत्रके मागविण्यात आली परंतु मुदतीत एकही दरपत्रक प्राप्त झालेले नाही. तद्नंतर ३ वेळा दरपत्रके मागविण्यात आली. परंतु मुदतीत एकही दरपत्रके प्राप्त झालेली नाहीत. तद्नंतर दि. १७/०३/२०२१ रोजी फेर जाहिर दरपत्रक सुचना प्रसिद्ध करण्यात आली. यावेळी सुद्धा एकही दरपत्रक प्राप्त झालेले नाही. पुनःश्च दि. ११/०२/२०२१ रोजी द्वितीय फेर जाहिर दरपत्रक सुचना प्रसिद्ध करण्यात आली. यावेळी सुद्ध एकही दरपत्रक प्राप्त झालेले नाही.

क) प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील **काळुंजा तलाव व शिरमोळी तलाव २ तलावांची** दि. ३०/०३/२०२१ रोजी ई- निविदा प्रसिद्ध करुन दि. १६/०४/२०२१ रोजीपर्यंत ई-निविदा मागविण्यांत आल्या. मुदतीत एकही ई-निविदा प्राप्त झालेल्या नाहीत.

ड) प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील **डोंगरी मोडी तलाव, भोलाव तलाव इंदाणी वराळे तलाव या ३ तलावांची** दि. २०/०५/२०२१ रोजी ई- निविदा मागविण्यांत आल्या. मुदतीत एकही ई-निविदा प्राप्त झालेली नव्हती. तद्नंतर दि. ०२/०६/२०२१ रोजी जाहिर फेर ई-निविदा सुचना प्रसिद्ध करण्यात आल्यानंतर एकही ई-निविदा प्राप्त न झाल्याने दि. ११/०६/२०२१ रोजी प्रथम मुदतवाढ तसेच दितीय मुदतवाढ देण्यात आली. यावेळी सुद्धा एकही ई-निविदा प्राप्त झालेली नव्हती. **अशाप्रकारे वारंवार तलाव लिलावाकरीता वारंवार ई-निविदा / दरपत्रके मागवून सुद्धा ठेकेदाराकडून तलाव लिलावास प्रतिसाद मिळालेला नव्हता.**

वरील (अ) (ब) (क) (ड) नुसार एकुण १४ तलावांची एकही ई-निविदा अथवा दरपत्रक प्राप्त झाले नसल्याने प्रशासकिय ठराव क्र. १२९ दि. २८/०४/२०२२ अन्वये सदर तलावांवरील १८% GST रद्द करुन तसेच सर्व तलावांच्या तीन वर्षांच्या रक्कमेवर १० % रक्कम कमी करण्यात आली. तद्नंतर पुनःश्च जाहिर ई-निविदा सुचना तसेच जाहिर दरपत्रक सुचना प्रसिद्ध करण्यात आली. परंतू त्यावेळी सुद्धा (अ) (ब) (क) (ड) मधील एकुण १४ तलावांची ई-निविदा अथवा दरपत्रक प्राप्त झालेले नव्हते.

५) **मराळे तलाव :-** आकारमान २९६६.५० चौ.मी.,
सदर तलाव हा गास विभागात येत असून सदर तलाव सुस्थितीत आहे. सदरचा तलाव हा प्रती वर्षी १०% वाढीव रक्कम वाढ करीत असल्याने तलावास दरपत्रकधारकांचा प्रतिसाद मिळत नाही.

६) **कुक्कुटसार तलाव :-** आकारमान १९७७ चौ.मी.,
सदर तलाव हा गास विभागात येत असून सदर तलावाच्या तिन्ही बाजुंनी बांधकामे झालेली असून तलावाचे आकारमान कमी झालेले आहे. सदरचा तलाव हा प्रती वर्षी १०% वाढीव रक्कम वाढ करीत असल्याने तलावास दरपत्रकधारकांचा प्रतिसाद मिळत नाही.

७) **सातारी तलाव :-** आकारमान ६५० चौ.मी.,
सदर तलाव हा गास विभागात येत असून सदर तलाव हा बावखळ स्वरुपात आहे. सद्यस्थितीत सदरचा तलाव पानफुटीने भरलेला असल्याने दरपत्रकधारकांचा प्रतिसाद मिळत नाही.

८) **जोसोडी तलाव :-** आकारमान २८७६ चौ.मी.,
सदर तलाव हा भुईगाव विभागात येत असून सदर तलाव हा सुस्थितीत आहे परंतू प्रती वर्षी १०% वाढीव रक्कम वाढ करीत असल्याने तलावास दरपत्रकधारकांचा प्रतिसाद मिळत नाही.

९) **उसारा तलाव :-** आकारमान ३३१९.६० चौ.मी.,
सदर तलाव हा नाळे विभागात येत असून सदर तलाव हा सुस्थितीत आहे. परंतु पावसाळयात वाघोली विभागातून येणारा सर्व पावसाचे पाणी या तलावातून जाते. त्यामुळे मत्स्यसंवर्धनाकरिता पावसाळयात तलावात टाकलेले मत्स्यबीज वाहून जात असल्याने दरपत्रकधारकांचा प्रतिसाद मिळत नाही.

१०) **काळुंजा तलाव :-** आकारमान १३८४४ चौ.मी., निविदा रक्कम ३,२७,६९०/- (तीन वर्षांकरिता)
सदर तलाव हा गास विभागात येत असून सदर तलावाच्या तिन्ही बाजुंना इमारती असून इमारतींचा सर्व सांडपाणी सदर तलावात सोडलेला आहे. त्यामुळे तलावाची अत्यंत दुर्दशा झालेली असल्याने दरपत्रकधारकांचा प्रतिसाद मिळत नाही.

११) **शिरमोळी तलाव :-** आकारमान ४८५६ चौ.मी., निविदा रक्कम ६,४२,६३६/- (तीन वर्षांकरिता)
सदर तलाव हा गास विभागात येत आहे. तलावाच्या चारही बाजुने अनधिकृत बांधकामे झाल्याने तलावाचे आकारमान कमी झालेले आहे. तसेच सदर तलावाबाबत ट्रस्टीने मालकी हक्काबाबत महानगरपालिकेत दावा केलेबाबत पत्र दिलेले आहे.

१२) **इंदाणी-वराळे तलाव :-** आकारमान ३४४४ चौ.मी., निविदा रक्कम ४,०५,२७९/- (तीन वर्षांकरिता)
सदर तलाव हा गास विभागात येत असून सदर तलावास घरांच्या बांधकामामुळे भराव घालून विभागलेला आहे. १ भाग हा पानफुटीने पुर्ण भरलेला आहे. तर दुसरा भाग सुस्थितीत आहे. असल्याने दरपत्रकधारकांचा प्रतिसाद मिळत नाही. परंतू प्रती वर्षी १०% वाढीव रक्कम वाढ करीत असल्याने तलावास दरपत्रकधारकांचा प्रतिसाद मिळत नाही.

१३) **भोलाव तलाव :-** आकारमान ७२०९.६० चौ.मी., निविदा रक्कम ३,३६,५०१/- (तीन वर्षांकरिता)
सदर तलाव हा भुईगाव विभागात येत असून सदर तलाव हा खोदला गेल्याने मासेमारीसाठी अवघड असल्याने दरपत्रकधारकांचा प्रतिसाद मिळत नाही.

१४) **डोंगरीमोडी तलाव :-** आकारमान ९३३९.८० चौ.मी., निविदा रक्कम ३,१३,१२६/- (तीन वर्षांकरिता)
सदर तलाव हा भुईगाव विभागात येत असून सदर तलाव सुस्थितीत असून परंतू प्रती वर्षी १०% वाढीव रक्कम वाढ करीत असल्याने तलावास दरपत्रकधारकांचा प्रतिसाद मिळत नाही.

वरील सर्व १४ तलावांकरिता ठराव क्र. १२९ दि. २८/०४/२०२२ अन्वये ई-निविदा/दरपत्रक प्रसिद्ध करुन मागविण्यात आलेल्या तलावांच्या तपशिल खालीलप्रमाणे आहे.

तक्ता (अ) :-

अ.क्र.	तलावाचे नाव	रक्कम (सन २०२१-२४) (३ वर्षाकरिता)
१.	मराळे तलाव	६७१७६
२.	कुक्कुटसार तलाव	१६८७६०
३.	सातारी तलाव	६१६०६
४.	जोसोडी तलाव	७५३८२
५.	उसारा तलाव	७७०१०
६.	कोरलमान तलाव	९३७०१
७.	कोरला तलाव	४७८७०
८.	तळपा तलाव	३८७७६
९.	खुटलई तलाव	७४२७८
१०.	डोंगरी मोडी तलाव	२८१८१३
११.	भोलाव तलाव	३०२८५१
१२.	इंदाणी-वराळे तलाव	३६५३७४
१३.	काळुंजा तलाव	२९४९२१
१४.	शिरमोळी तलाव	५७८३७२

तरी तक्ता (अ) तलावांची निविदा प्रक्रिया पाहता सदर तलावांकरिता एकही दरपत्रकधारक अथवा निविदाधारक सहभाग घेत नसल्याचे निदर्शनास येत असून महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्न मिळत नाही. याबाबत सदर तलावांची दि. ३१/०३/२०२३ रोजी प्रत्यक्ष तलावाच्या ठिकाणी जाऊन पाहाणी केली असता, वरील १४ तलावांची स्थिती खालीलप्रमाणे निदर्शनास आलेली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

१) **कोरलमान तलाव :-** आकारमान ४३३४ चौ.मी.,

सदर तलाव हा गास विभागात येत असून भुईगाव पोलीस चौकीसमोर आहे. सदर तलावाची स्थिती हि सुस्थितीत असून तलावास कम्पाऊंड वॉलची आवश्यकता आहे. सदरचा तलाव हा मागी वर्षी १०% वाढीव रक्कम वाढ करीत असल्याने तलावास दरपत्रकधारकांचा प्रतिसाद मिळत नाही.

२) **कोरला तलाव :-** आकारमान ४१६ चौ.मी.,

सदर तलाव हा गास विभागात येत असून सदर तलाव हा बावखळ स्वरुपात आहे. सद्यस्थितीत सदरचा तलाव पानफुटीने भरलेला असल्याने दरपत्रकधारकांचा प्रतिसाद मिळत नाही.

३) **तळपा तलाव :-** आकारमान १५५० चौ.मी.,

सदर तलाव हा गास विभागात येत असून सदर तलाव हा बावखळ स्वरुपात आहे. सद्यस्थितीत सदरचा तलाव पानफुटीने भरलेला असल्याने दरपत्रकधारकांचा प्रतिसाद मिळत नाही.

४) **खुटलई तलाव :-** आकारमान ११७७.५० चौ.मी.,

सदर तलाव हा गास विभागात येत असून सदर तलाव हा बावखळ स्वरुपात असल्याने दरपत्रकधारकांचा प्रतिसाद मिळत नाही.

प्रस्तावात नमुद सन २०२२ ते सन २०२४ या वर्षामध्ये निविदा/दरपत्रक मंजुर होऊन मत्स्यसंवर्धनाचा ठेका देण्यात आलेल्या एकुण २२ तलावांच्या रकमेमध्ये प्रती वर्षी १०% वाढ न करता, खालील तक्ता (ब) मध्ये नमुद प्राप्त ज्यादा देकार रक्कमेवर सन २०२५ ते सन २०२८ या ३ वर्षांच्या कालावधीकरिता निविदा/दरपत्रक प्रसिद्ध केल्यास निविदाकारांचा/ दरपत्रकधारकांचा सहभाग नोंदविला जाऊ शकतो अशी धारणा आहे.

तक्ता (ब) :-

अ.क्र.	तलावाचे नाव	मागील सन २०२१ ते २०२४ मधील प्राप्त मंजुर उच्चत्तम रक्कम (३ वर्षांसाठी)
१.	डेरा तलाव	३००००
२.	कोळबाव तलाव	५९२००
३.	आंबड तलाव	१०१०००
४.	कुंभेर तलाव	२९१०२१
५.	भाटेला तलाव	१६७२००
६.	नवाळे तलाव	१५२०००
७.	भादले तलाव	५३०००
८.	एंडाळे तलाव	८०९९१
९.	बाभळ तलाव	१६५००
१०.	गणेश तलाव	३८५००
११.	वाटाण तलाव	४८५००
१२.	डेवणी तलाव	१८०००
१३.	विसराळे तलाव	२५०००
१४.	बाग डोंगरी तलाव	२३०००
१५.	मासळई तलाव	५०५००
१६.	केळाम तलाव	७००००
१७.	काळी धोंड तलाव	१५०००
१८.	डोंगरी लहान तलाव	२२७८६
१९.	सोज तलाव	१८५००
२०.	बाडगुळे तलाव	५६८००
२१.	मालई तलाव	११२७६७९
२२.	गास मोठा तलाव	१९९६९९७

सबब उक्त तक्त्यामधील अ.क्र. १ ते २० या तलावांची दि. ०१/१०/२०२५ ते दि. ३०/०९/२०२८ या तीन वर्षांच्या कालावधीकरिता दरपत्रके प्रसिद्ध करता येऊ शकतील. तसेच अ.क्र. २१ व २२ या तलावांची दि. ०१/१०/२०२५ ते दि. ३०/०९/२०२८ या तीन वर्षांच्या कालावधीकरिता ई-निविदा प्रसिद्ध करता येऊ शकतील.

तसेच प्रस्तावात नमुद विमल तलाव व नाळे मोठा तलाव हे २ तलाव सुशोभिकरणाकरिता आरक्षित असल्याने सदर तलावाची ई-निविदा प्रसिद्ध करता येत नाही.

सबब प्रस्तावाचे अवलोकन केले असता, प्रभाग समिती (ई) हद्दीमधील तलाव लिलावाची ई-निविदा / दरपत्रके प्रसिद्ध करुन देखील ठेकेदाराकडून प्रतिसाद मिळत नसल्याने सद्यस्थितीत तलावापासुन महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्न प्राप्त होत नाही.

सबब प्रस्तावात तक्ता (अ) व (ब) नमुद रकमेवर कोणतीही वाढ न करता तलावांची दि. ०१/१०/२०२५ ते दि. ३०/०९/२०२८ या तीन वर्षांच्या कालावधीकरिता दरपत्रके/ई-निविदा प्रसिद्ध केल्यास सदर तलावांस ठेकेदाराकडुन प्रतिसाद मिळू शकेल अशी धारणा आहे.

सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा पुढील आदेशास्तव सविनय सादर.

ठरावाचा निर्णय - उक्त प्रस्तावात नमुद तक्ता (अ) व तक्ता (ब) मधील तलाव निहाय नमुद मागील मंजुर उच्चतम देकारानुसार दि. ०१/१०/२०२५ ते दि. ३०/०९/२०२८ या तीन वर्षांच्या कालावधीकरिता सदर तलाव ठेका पद्धतीने मत्स्यसंवर्धनासाठी देणेस जाहिर ई-निविदा प्रसिद्ध करणेकामी कलम ६७(३) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार आयुक्त तथा प्रशासक प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

मनोज कुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), जि. - पालघर, पिन नं. 401 303
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 2218 विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- 02/02/2025

प्रस्तावाचा विषय :- सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या त्रैवार्षिक वर्षात वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ए व सी (बी पार्ट) अंतर्गत पाणी पुरवठा व्यवस्थापन करणेकामी सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या त्रैवार्षिक वर्षात वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ए व सी (बी पार्ट) अंतर्गत पाणी पुरवठा व्यवस्थापन करणेकामी सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता आवश्यक असून निविदेचा सविस्तर तपशील खालील प्रमाणे आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु.१२,७५,०४,६९५/-
प्रशासकीय मान्यता	:-	प्रशासकीय ठराव क्र.१५६ दि.०५/०५/२०२२
निविदा मंजूरी	:-	प्रशासकीय ठराव क्र. ११२२ दि.१९/१०/२०२२
मंजूर दर	:-	अंदाजपत्रकीय दराच्या २०% जादा दराने
स्विकृत निविदा किंमत	:-	रू. १२,७५,४८,१७३/-
मंजूर ठेकेदार	:-	मे. आर.जी. कन्स्ट्रक्शन
करारनामा	:-	दि. २४/११/२०२२
कार्यादेश	:-	जा.क्र. वविशम/पापु/७९१/२२ दि. २४/११/२०२२
सन २०२२-२३ वित्तीय मान्यता	:-	प्रशासकीय ठराव क्र.१५६ दि.०५/०५/२०२२ रु.३,८५,२१,०५५/-
सन २०२३-२४ वित्तीय मान्यता	:-	प्रशासकीय ठराव क्र. ३०८० दि.१३/०२/२०२४ रु.४,२३,७३,१६२/-
सन २०२४-२५ वित्तीय मान्यता	:-	प्रशासकीय ठराव क्र.२२८३ दि.१२/०२/२०२२ रु. ४,५०,००,०००/-

मुळ प्राप्त प्रशासकीय मान्यता रु.१२,७५,०४,६९५/- मधून मे. आर.जी. कन्सट्रक्शन यांना विषयांकीत कामी कार्यादेश दिल्यानंतर त्यांनी कामास सुरूवात करून आत्तापर्यंत त्यांना मासिक मनुष्यबळ वेतन, योजना देखभाल दुरूस्ती, कर्मचारी विशेष भत्ता व वार्षिक रजा वेतन इत्यादी पोटी रु.१३,२९,५६,८४६/- इतकी रक्कम प्रदान करण्यात आली आहे.

विषयांकीत मंजूर ठेक्याची मुदत दि.३०/११/२०२५ रोजी संपुष्ठात येत असल्याने उपरोक्त विषयांकीत कामी नव्याने ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत सदर निविदेचा लखोटा क्र. १ उघडण्यात आला आहे. वसई-विरार शहर महानगरपालिका सार्वत्रीक

Maka3

निवडणूक २०२५ अनुषंगाने आचार संहिता लागू झाल्याने निवडणूक होईपर्यंत सदर नव्याने मागविण्यात आलेल्या निविदा मंजूरीस विलंब झाला आहे. निवडणूक काळ व नव्याने निविदा मंजूरीस होणारा विलंब लक्षात घेऊन विषयांकीत कामाचे मंजूर कंत्राटदार यांचे मार्फत विभागाने कामे सुरू ठेवून महानगरपालिकेची संभाव्य गैरसोय टाळली आहे.

पाणी पुरवठा दैनंदिन देखभाल दुरूस्ती करणे तसेच सर्व झोन मध्ये पाणी वितरीत करणे या अत्यावश्यक सेवा व जीवनावश्यक बाब या सदराखाली विषयांकीत मंजूर ठेक्यास माहे एप्रिल, २०२६ पर्यंत अथवा नव्याने मागविण्यात आलेल्या निविदा मंजूर होईपर्यंत यात जी बाब प्रथम होईल तो पर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

सदर मंजूर ठेक्या अंतर्गत माहे ऑक्टोंबर, २०२५ व नोव्हेंबर, २०२५ या मुळ मुदतीतील देयके तसेच माहे डिसेंबर २०२५ ते माहे एप्रिल, २०२६ मधील वेतन व देखभाल दुरूस्ती देयक तसेच माहे जुलै, २०२५ ते नोव्हेंबर, २०२५ या मधील विशेष भत्ता फरक तसेच वार्षिक रजा वेतनापोटी देयके अदा करावयाची असून या सर्व देयकाचा विचार करता माहे एप्रिल, २०२६ पर्यंत एकूण निविदेवर रु.३,६१,११,६३२/- खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्च हा मुळ प्रशासकीय रक्कम रु.१२,७५,०४,६९५/- च्या वर होणार असल्याने वाढीव खर्चासह एकूण निविदेवर होणाऱ्या रु.१६,३६,१६,३२७/- खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता आहे.

खर्चात झालेल्या वाढीबाबत ठळक कारणे.

१. विषयांकीत कामाच्या अंदाजपत्रकात त्यावेळी प्रचलीत असलेल्या दरानुसार महागाई भत्ता रु. ६,०५०/- हो गृहित धरण्यात आला होता. किमान वेतन अधिनिय १९४८ अंतर्गत कंत्राटी कामगारांचे किमान वेतन दरावरील महागाई भत्ता व विशेष भत्त्याचे दर मा. कामगार उप आयुक्त यांचेकडुन प्रती सहामाही प्रसिध्द होत असूनसद्य:स्थितीत सदरचा दर हे रु.९,१००/- इतका झाला आहे. त्यानुसार तृतीय वर्षात वाढीव महागाई भत्ता फरक ठेकेदाराने कर्मचाऱ्यांना अदा केला असून त्याची प्रतिपुर्ती देयके माहे मार्च, २०२५ व माहे जुलै, २०२५ मध्ये ठेकेदारास प्रदान करण्यात आली आहेत.

२. अमृत १ योजनेअंतर्गत मे. आर.ए.घुले, पालघर या ठेकेदाराने अंथरलेल्या जलवाहिन्यांमध्ये बऱ्याच ठिकाणी गळत्या असल्याचे निदर्शनास आल्याने तसेच अमृत १ अंतर्गत उभारण्यात आलेले जलकुंभ भरण्याकरीता आवश्यक असणारी जलवाहिन्यांची कामे सदर निविदेअंतर्गत करण्यात आली आहेत.

३. महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत ४० ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र उभारली असून सदर ठिकाणी पाणी पुरवठा व्यवस्था सदर निविदेअंतर्गत करण्यात आली आहे.

४. सार्व. शौचालय, मुतारी व निवडणूक काळात मतदान केंद्रांवर आवश्यक पाणी पुरवठा व्यवस्था करण्याच्या दृष्टीने सदर निविदेअंतर्गत कामे केली आहेत.

५. महाराष्ट्र किमान वेतन नियम, १९६३ चे कलम २७ (१) (एफ) नुसार ज्या कर्मचाऱ्यांची एका कॅलेंडर वर्षात २४० दिवस अथवा त्यापेक्षा अधिक दिवस उपस्थिती आहे त्यांना परिगणीत सुत्रानुसार रजा वेतन देणे अनुज्ञेय आहे. त्यानुसार याकामी येणाऱ्या खर्चास व ठेकेदाराच्या प्रतिपुर्ती देयकास प्रशासकीय ठराव क्र. १२२४ दि.२४/०७/२०२५ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार सदर निविदेअंतर्गत सदर खर्च येणे अपेक्षीत आहे.

महाराष्ट्र सार्व. बांधकाम नियम पुस्तिकामधील नियम १३४ ब नुसार एखाद्या कामात फेरबदल करावयाचे असतील अशा प्रकरणी आवश्यक असेल तेथे तपशिलवार पुरक किंवा सुधारीत

अंदाजपत्रक तयार करण्याची वाट न बघता सक्षम प्राधिकरणाची सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळाली पाहिजे असे निर्देश आहेत. सबब सदर तरतुदीनुसार याकामी एकूण होणाऱ्या रु.१६,३६,१६,३२७/- खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता आवश्यक आहे.

सदर कामाचा खर्च सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पातील "शहरांतर्गत योजना दुरूस्ती देखभाल" या लेखाशिर्षाअंतर्गत उपलब्ध तरतुदीमधून भागविणे शक्य आहे.

तरी सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या त्रैवार्षिक वर्षात वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती " ए व सी (बी पार्ट) " मधील पाणी पुरवठा व्यवस्थापन करणेकामी मे. आर.जी. कन्स्ट्रक्शन या मंजूर ठेकेदारास माहे एप्रिल, २०२६ पर्यंत कोणतीही भाववाढ न देता मुदतवाढ देण्यास तसेच सदर निविदेअंतर्गत येणाऱ्या रु.३,६१,११,६३२/- इतका वाढीव खर्च धरून एकूण निविदेवर होणाऱ्या रु.१६,३६,१६,३२७/- खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. आयुक्त यांच्या मंजूरीस्तव सविनय सादर.

ठराव :-

१. सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या त्रैवार्षिक वर्षात वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती " ए व सी (बी पार्ट) " मधील पाणी पुरवठा व्यवस्थापन करणेकामी मे. आर.जी. कन्स्ट्रक्शन या मंजूर ठेकेदारास माहे एप्रिल, २०२६ पर्यंत कोणतीही भाववाढ न देता मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. विभागाने याकामी केलेल्या कार्यवाहीस तसेच प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे याकामी मुळ प्रशासकीय मान्यता रु.१२,७५,०४,६९५/- इतकी असून निविदेअंतर्गत येणारा रु.३,६१,११,६३२/- इतका वाढीव खर्च धरून एकूण निविदेवर होणाऱ्या रु.१६,३६,१६,३२७/- खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

३. सुधारीत खर्चानुसार वाढीव सुरक्षा अनामत व मुद्रांक शुल्क भरून घेण्याची जबाबदारी विभागाची राहील.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), जि. - पालघर, पिन नं. 401 303
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 2295

विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- 02/02/2025

प्रस्तावाचा विषय :- सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या त्रैवार्षिक वर्षात वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "जी/एच/आय" पाणी पुरवठा विभागाअंतर्गत पाणी पुरवठा व्यवस्थापन करणेकामी सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या त्रैवार्षिक वर्षात वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "जी/एच/आय" पाणी पुरवठा विभागाअंतर्गत पाणी पुरवठा व्यवस्थापन करणेकामी सन २०२४-२५ या आर्थीक वर्षाकरीता वित्तीय मान्यता आवश्यक असून निविदेचा सविस्तर तपशील खालील प्रमाणे आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु.२१,३२,५३,६१४/-
प्रशासकीय मान्यता	:-	मा. प्रशासक ठराव क्र.१५८ दि.०५/०५/२०२२
निविदा मंजूरी		प्रशासकीय ठराव क्र. ११२१ दि.१९/१०/२०२२
मंजूर दर		अंदाजपत्रकीय दराच्या २०% जादा दराने
स्विकृत निविदा किंमत		रू. २१,३१,३७,२२२/-
मंजूर ठेकेदार		मे. आर.जी. कन्स्ट्रक्शन
करारनामा		दि. २४/११/२०२२
कार्यादेश		जा.क्र. वविशम/पापु/७९२/२२ दि. २४/११/२०२२
सन २०२२-२३ वित्तीय मान्यता	:-	प्रशासकीय ठराव क्र.१५८ दि.०५/०५/२०२२ रु.६,४४,२७,०७४/-
सन २०२३-२४ वित्तीय मान्यता	:-	प्रशासकीय ठराव क्र. ३०८१ दि.१३/०२/२०२४ रु.७,०८,६९,७८१/-
सन २०२४-२५ वित्तीय मान्यता	:-	प्रशासकीय ठराव क्र.२२८५ दि.१२/०२/२०२५ रु.६,००,००,०००/-

मुळ प्राप्त प्रशासकीय मान्यता रु.२१,३२,५३,६१४/- मधून मे. आर.जी. कन्सट्रक्शन यांना विषयांकीत कामी कार्यादेश दिल्यानंतर त्यांनी कामास सुरूवात करून आत्तापर्यंत त्यांना मासिक मनुष्यबळ वेतन, योजना देखभाल दुरूस्ती, कर्मचारी विशेष भत्ता व वार्षिक रजा वेतन इत्यादी पोटी रु.२१,५०,४३,२९०/- इतकी रक्कम प्रदान करण्यात आली आहे.

विषयांकीत मंजूर ठेक्याची मुदत दि.३०/११/२०२५ रोजी संपुष्ठात येत असल्याने उपरोक्त विषयांकीत कामी नव्याने ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत सदर निविदेचा लखोटा क्र. १ उघडण्यात आला आहे. वसई-विरार शहर महानगरपालिका सार्वत्रीक

निवडणूक २०२५ अनुषंगाने आचार संहिता लागू झाल्याने निवडणूक होईपर्यंत सदर नव्याने मागविण्यात आलेल्या निविदा मंजूरीस विलंब झाला आहे. निवडणूक काळ व नव्याने निविदा मंजूरीस होणारा विलंब लक्षात घेऊन विषयांकीत कामाचे मंजूर कंत्राटदार यांचे मार्फत विभागाने कामे सुरू ठेवून महानगरपालिकेची संभाव्य गैरसोय टाळली आहे.

पाणी पुरवठा दैनंदिन देखभाल दुरूस्ती करणे तसेच सर्व झोन मध्ये पाणी वितरीत करणे या अत्यावश्यक सेवा व जीवनावश्यक बाब या सदराखाली विषयांकीत मंजूर ठेक्यास माहे एप्रिल, २०२६ पर्यंत अथवा नव्याने मागविण्यात आलेल्या निविदा मंजूर होईपर्यंत यात जी बाब प्रथम होईल तो पर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

सदर मंजूर ठेक्या अंतर्गत माहे ऑक्टोंबर, २०२५ व नोव्हेंबर, २०२५ या मुळ मुदतीतील देयके तसेच माहे डिसेंबर २०२५ ते माहे एप्रिल, २०२६ मधील वेतन व देखभाल दुरूस्ती देयक तसेच माहे जुलै, २०२५ ते नोव्हेंबर, २०२५ या मधील विशेष भत्ता फरक इत्यादी देयके अदा करावयाची असून या सर्व देयकाचा विचार करता माहे एप्रिल, २०२६ पर्यंत एकूण निविदेवर रु.३,८२,६९,९७८/- खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्च हा मुळ प्रशासकीय रक्कम रु.२१,३२,५३,६१४/- च्या वर होणार असल्याने वाढीव खर्चासह एकूण निविदेवर होणाऱ्या रु.२५,१५,२३,५९२/- खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता आहे.

खर्चात झालेल्या वाढीबाबत ठळक कारणे.

१. विषयांकीत कामाच्या अंदाजपत्रकात त्यावेळी प्रचलीत असलेल्या दरानुसार महागाई भत्ता रु. ६,०५०/- हो गृहित धरण्यात आला होता. किमान वेतन अधिनिय १९४८ अंतर्गत कंत्राटी कामगारांचे किमान वेतन दरावरील महागाई भत्ता व विशेष भत्त्याचे दर मा. कामगार उप आयुक्त यांचेकडुन प्रती सहामाही प्रसिध्द होत असून सद्य:स्थितीत सदरचा दर हे रु.९,१००/- इतका झाला आहे. त्यानुसार तृतीय वर्षात वाढीव महागाई भत्ता फरक ठेकेदाराने कर्मचाऱ्यांना अदा केला असून त्याची प्रतिपुर्ती देयके माहे मार्च, २०२५ व माहे जुलै, २०२५ मध्ये ठेकेदारास प्रदान करण्यात आली आहेत.

२. अमृत १ योजनेअंतर्गत मे. आर.ए.घुले, पालघर या ठेकेदाराने अंथरलेल्या जलवाहिन्यांमध्ये बऱ्याच ठिकाणी गळत्या असल्याचे निदर्शनास आल्याने तसेच अमृत १ अंतर्गत उभारण्यात आलेले जलकुंभ भरण्याकरीता आवश्यक असणारी जलवाहिन्यांची कामे सदर निविदेअंतर्गत करण्यात आली आहेत.

३. महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत ४० ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र उभारली असून सदर ठिकाणी पाणी पुरवठा व्यवस्था सदर निविदेअंतर्गत करण्यात आली आहे.

४. सार्व. शौचालय, मुतारी व निवडणूक काळात मतदान केंद्रांवर आवश्यक पाणी पुरवठा व्यवस्था करण्याच्या दृष्टीने सदर निविदेअंतर्गत कामे केली आहेत.

५. महाराष्ट्र किमान वेतन नियम, १९६३ चे कलम २७ (१) (एफ) नुसार ज्या कर्मचाऱ्यांची एका कॅलेंडर वर्षात २४० दिवस अथवा त्यापेक्षा अधिक दिवस उपस्थिती आहे त्यांना परिगणीत सुत्रानुसार रजा वेतन देणे अनुज्ञेय आहे. त्यानुसार याकामी येणाऱ्या खर्चास व ठेकेदाराच्या प्रतिपुर्ती देयकास प्रशासकीय ठराव क्र. १२२४ दि.२४/०७/२०२५ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार सदर निविदेअंतर्गत सदर खर्च येणे अपेक्षीत आहे.

महाराष्ट्र सार्व. बांधकाम नियम पुस्तिकामधील नियम १३४ ब नुसार एखाद्या कामात फेरबदल करावयाचे असतील अशा प्रकरणी आवश्यक असेल तेथे तपशिलवार पुरक किंवा सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्याची वाट न बघता सक्षम प्राधिकरणाची सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळाली

पाहिजे असे निर्देश आहेत. सबब सदर तरतुदीनुसार याकामी एकूण होणाऱ्या रु.२५,१५,२३,५९२/- खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता आवश्यक आहे.

सदर कामाचा खर्च सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पातील "शहरांतर्गत योजना दुरूस्ती देखभाल" या लेखाशिर्षाअंतर्गत उपलब्ध तरतुदीमधून भागविणे शक्य आहे.

तरी सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या त्रैवार्षिक वर्षात वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "जी/एच/आय" मधील पाणी पुरवठा व्यवस्थापन करणेकामी मे. आर.जी. कन्स्ट्रक्शन या मंजूर ठेकेदारास माहे एप्रिल, २०२६ पर्यंत कोणतीही भाववाढ न देता मुदतवाढ देण्यास तसेच सदर निविदेअंतर्गत येणाऱ्या रु.३,८२,६९,९७८/- इतका वाढीव खर्च धरून एकूण निविदेवर होणाऱ्या रु.२५,१५,२३,५९२/- खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. आयुक्त यांच्या मंजूरीस्तव सविनय सादर.

ठराव :-

१. सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या त्रैवार्षिक वर्षात वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती " जी/एच/आय " मधील पाणी पुरवठा व्यवस्थापन करणेकामी मे. आर.जी. कन्स्ट्रक्शन या मंजूर ठेकेदारास माहे एप्रिल, २०२६ पर्यंत कोणतीही भाववाढ न देता मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. विभागाने याकामी केलेल्या कार्यवाहीस तसेच प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे याकामी मुळ प्रशासकीय मान्यता रु.२१,३२,५३,६१४/- इतकी असून निविदेअंतर्गत येणारा रु.३,८२,६९,९७८/- इतका वाढीव खर्च धरून एकूण निविदेवर होणाऱ्या रु.२५,१५,२३,५९२/- खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

३. सुधारीत खर्चानुसार वाढीव सुरक्षा अनामत व मुद्रांक शुल्क भरून घेण्याची जबाबदारी विभागाची राहील.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), जि. - पालघर, पिन नं. 401 303
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 2291

विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- 02/02/2026

प्रस्तावाचा विषय :- सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या त्रैवार्षिक वर्षात वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "बी/ई व "डी/एफ" अंतर्गत पाणी पुरवठा व्यवस्थापन करणेकामी माहे एप्रिल, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यास तसेच येणाऱ्या खर्चास वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या त्रैवार्षिक वर्षात वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "बी/ई व "डी/एफ" अंतर्गत पाणी पुरवठा व्यवस्थापन करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता आवश्यक असून निविदेचा सविस्तर तपशील खालील प्रमाणे आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु.२१,६६,८५,२८४/-
प्रशासकीय मान्यता	:-	मा. प्रशासक ठराव क्र.१५९ दि.०५/०५/२०२२
निविदा मंजूरी	:-	प्रशासकीय ठराव क्र. ११२० दि.१९/१०/२०२२
मंजूर दर	:-	अंदाजपत्रकीय दराच्या २०% जादा दराने
स्विकृत निविदा किंमत	:-	रू. २१,७९,३४,३८१/-
मंजूर ठेकेदार	:-	मे. आर.जी. कन्स्ट्रक्शन
करारनामा	:-	दि. २४/११/२०२२
कार्यादेश	:-	जा.क्र. वविशम/पापु/७९०/२२ दि. २४/११/२०२२
सन २०२२-२३ वित्तीय मान्यता	:-	प्रशासकीय ठराव क्र.१५९ दि.०५/०५/२०२२ रु.६,५४,६३,८३२/-
सन २०२३-२४ वित्तीय मान्यता	:-	प्रशासकीय ठराव क्र. ३०८२ दि.१३/०२/२०२४ रु.७,२०,१०,२१५/-
सन २०२४-२५ वित्तीय मान्यता	:-	प्रशासकीय ठराव क्र.२२८४ दि.१२/०२/२०२५ रु.६,००,००,०००/-

मुळ प्राप्त प्रशासकीय मान्यता रु.२१,६६,८५,२८४/- मधून मे. आर.जी. कन्सट्रक्शन यांना विषयांकीत कामी कार्यादेश दिल्यानंतर त्यांनी कामास सुरूवात करून आत्तापर्यंत त्यांना मासिक मनुष्यबळ वेतन, योजना देखभाल दुरूस्ती, कर्मचारी विशेष भत्ता व वार्षिक रजा वेतन इत्यादी पोटी रु.१७,६३,५४,३४३/- इतकी रक्कम प्रदान करण्यात आली आहे.

विषयांकीत मंजूर ठेक्याची मुदत दि.३०/११/२०२५ रोजी संपुष्ठात येत असल्याने उपरोक्त विषयांकीत कामी नव्याने ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत सदर निविदेचा लखोटा क्र. १ उघडण्यात आला आहे. वसई-विरार शहर महानगरपालिका सार्वत्रीक निवडूणक २०२५ अनुषंगाने आचार संहिता लागू झाल्याने निवडणूक होईपर्यंत सदर नव्याने

मागविण्यात आलेल्या निविदा मंजूरीस विलंब झाला आहे. निवडणूक काळ व नव्याने निविदा मंजूरीस होणारा विलंब लक्षात घेऊन विषयांकीत कामाचे मंजूर कंत्राटदार यांचे मार्फत विभागाने कामे सुरू ठेवून महानगरपालिकेची संभाव्य गैरसोय टाळली आहे.

पाणी पुरवठा दैनंदिन देखभाल दुरूस्ती करणे तसेच सर्व झोन मध्ये पाणी वितरीत करणे या अत्यावश्यक सेवा व जीवनावश्यक बाब या सदराखाली विषयांकीत मंजूर ठेक्यास माहे एप्रिल, २०२६ पर्यंत अथवा नव्याने मागविण्यात आलेल्या निविदा मंजूर होईपर्यंत यात जी बाब प्रथम होईल तो पर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

सदर मंजूर ठेक्या अंतर्गत आत्तापर्यंत रु.१७,६३,५४,३४३/- खर्च झाला असून माहे जुलै, २०२५ ते नोव्हेंबर, २०२५ विशेष भत्ता फरक, माहे डिसेंबर,२०२५ ते माहे एप्रिल, २०२६ पर्यंत वेतन व देखभाल दुरूस्ती करीता एकूण रु.२,४८,५४,६८८/- खर्च अपेक्षीत आहे. सदर निविदेवर एकूण होणारा खर्च हा मुळ प्रशासकीय रक्कम रु.२१,६६,८५,२८४/- च्या आत होणार आहे.

सदर कामाचा खर्च सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पातील "शहरांतर्गत योजना दुरूस्ती देखभाल" या लेखाशिर्षाअंतर्गत उपलब्ध तरतुदीमधून भागविणे शक्य आहे.

तरी सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या त्रैवार्षिक वर्षात वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती " बी/ई व "डी/एफ " मधील पाणी पुरवठा व्यवस्थापन करणेकामी मे. आर.जी. कन्स्ट्रक्शन या मंजूर ठेकेदारास माहे एप्रिल, २०२६ पर्यंत कोणतीही भाववाढ न देता मुदतवाढ देण्यास तसेच सदर निविदेअंतर्गत येणाऱ्या खर्चास वित्तीय मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. आयुक्त यांच्या मंजूरीस्तव सविनय सादर.

ठराव :-

१. सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या त्रैवार्षिक वर्षात वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती " बी/ई व "डी/एफ " मधील पाणी पुरवठा व्यवस्थापन करणेकामी मे. आर.जी. कन्स्ट्रक्शन या मंजूर ठेकेदारास माहे एप्रिल, २०२६ पर्यंत कोणतीही भाववाढ न देता मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. विभागाने याकामी केलेल्या कार्यवाहीस तसेच प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे निविदेअंतर्गत माहे एप्रिल, २०२६ पर्यंत येणारा खर्च हा रु.२१,६६,८५,२८४/- या मुळ प्रशासकीय व वित्तीय मान्यतेच्या आत होणार असल्याने सदर प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत माहे एप्रिल, २०२६ पर्यतच्या खर्चास अंतिम वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

३. मुदतवाढी अनुषंगाने खर्चात वाढ झाल्यास वाढीव सुरक्षा अनामत व मुद्रांक शुल्क भरून घेण्याची जबाबदारी विभागाची राहील.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), जि.पालघर, पिन नं.४०१ ३०३
दुरध्वनी - ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,

ठराव क्र. 2216

विभाग :- सार्व. बांधकाम
दिनांक :-०५/०२/२०२६

संदर्भ (मागील इतिवृत्ताचा संदर्भ नमूद करावा) :दि- ३१/१०/२०२५ रोजी निविदा समितीची मंजूरी	
विभाग: - सार्व. बांधकाम प्रभाग समिती (ए) बोळींज	
कामाचे नांव :- **वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र. ०३ मध्ये विजय विल्लभ हॉस्पिटल ते पुनम सुप्रीम बिल्डिंग पर्यंत आर.सी.सी पाईप गटार बांधणे.**	
लेखाशिर्ष :- गटार बांधकाम	योजनेचे नाव :-
अंदाजपत्रकीय रक्कम:- रु. ८५,५५,५८१/- त्रांत्रिक मान्यता रक्कम:- रु. ८५,५५,५८१/- निविदा रक्कम:- रु. ८५,५५,५८१/-	
प्रशासकीय मान्यता आदेश ठराव क्र. :- २३६ दिनांक:- ०७/०५/२०२५ प्रशासकीय मान्यतेची रक्कम :- रु. ८५,५५,५८१/-	
सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता रक्कम :- रु. ६३,३१,१३०/- (अंदाजपत्रकिय दरापेक्षा (-) २६.०० % कमी दराने)	
तांत्रिक मान्यता क्र.:- कार्यकारी अभियंता पु.क्र. ३ / १३ सन २०२५ - २६ दिनांक .०८/०५/२०२५	
ई निविदा सूचना प्रसिध्दी दिनांक:- ०९/०५/२०२५ वृत्तपत्र निविदा प्रसिध्दी दिनांक :- १०/०५/२०२५ कालावधी -०७ दिवस	
वृनपत्रांची नावे:- १) दै. आपला महानगर २) दै. वृत्तमानस ३) दै. खबरे आज तक ४) दै. परशुराम समाचार	
ई निविदा प्रसिध्दी तारीख :- दि. १३/०५/२०२५ पासून ते दि. २०/०५/२०२५ दु. ३.०० वा. पर्यंत	
ई निविदाद्वारे विहीत मुदतीत प्राप्त निविदा संख्या :- ०५	
प्रथम लिफाफा उघडण्याची दिनांक :- २२/०५/२०२५	
द्वितीय लिफाफा उघण्याची दिनांक :- ०३/११/२०२५	
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी (ज्यांच्या डीएससी ने निविदा उघडल्या त्यांची नावे नमूद करावीत):-	

प्राप्त दर

अ.क्र.	निविदाकार	निविदा दर	निविदेचा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षा कमी असल्यास पर फॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल	एल १, एल २, एल ३ इत्यादी नुसार क्रम निश्चित करुन नोंदवावा	एल १ चा तपशिल
१.	मे.रिषभ इंटरप्रायजेस	अंदाजपत्रकिय दरापेक्षा (-) २६.००% कमी दराने	परफॉर्मन्स सिक्युरीटी धनाकर्ष सोबत सादर केला आहे.	--	--

२.	मे. समीर कंन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रकिय दरापेक्षा (-) २४.००% कमी दराने	--	--	--
३.	मे. साई पोमू कंन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रकिय दरापेक्षा (-) २३.२०% कमी दराने	--	--	--
४.	मे. शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस	अंदाजपत्रकिय दरापेक्षा (-) २२.००% कमी दराने	--	--	--
५.	मे. आयुष कंन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रकिय दराने	--	--	--

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यांचे अभ्यास करता **मे. रिषभ इंटरप्रायजेस** यांची (-) २६.००% यांची निविदा प्राप्त निविदाधारकांमधील लघुत्तम दराची असून तुलनात्मक रित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

तरी **मे. रिषभ इंटरप्रायजेस** यांची (-) २६.००% (रक्कम रु. ६३,३१,१३०/-) निविदेस सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसह महाराष्ट्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (अ) अन्वये संविदा करणेसाठी तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यतेस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र. ०३ मध्ये विजय विल्लभ हॉस्पिटल ते पुनम सुप्रीम बिल्डिंग पर्यंत आर.सी.सी पाईप गटार बांधणे या कामास आयुक्त तथा प्रशासक **यांचा ठराव क्र. २३६ दि.०७/०५/२०२५** अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्ट्या पाहता **मे. रिषभ इंटरप्रायजेस** ह्यांचे **अंदाजपत्रकापेक्षा (-) २६.००% कमी** दर कमी व योग्य असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (अ) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक **मे. रिषभ इंटरप्रायजेस ह्यांना अंदाजपत्रकापेक्षा (-) २६.००% कमी दराने** (रक्कम रु. ६३,३१,१३०/-) निविदेस सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसह काम करणेस, कार्यादेश देणेस, संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहोत. तसेच अंदाजपत्रक मधील प्रत्येक टप्प्यावरील केलेल्या कामाचे Geo- Tagged फोटोग्राफ्स सादर करणे आवश्यक राहील तद्नंतर कामाचे देयक अदा करणेत यावे.

मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से.)
मा.आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार, यशवंत नगर, (प.) ता. वसई, जि. पालघर पिन नं 401303
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 2291 विभाग : मुख्यालय, लेखा विभाग

दिनांक : 02/02/2026

प्रस्तावाचा विषय :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या प्रकरण 9 व कलम 94 मधिल तरतुदीनुसार सन 2024-2025 ची वार्षिक लेखा विवरणपत्रे मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेपुढे मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेचा सन 2024-2025 सर्वसाधारण निधी, परिवहन समितीचा व विशेष निधी जमा व खर्च (दायीत्व) जमा खर्चाचे वार्षिक लेखे आवश्यक सहपत्रासह सोबत सादर केले आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 94 (3) प्रमाणे सर्व संबंधीतांकडे विवरणपत्राच्या प्रती पाठवणेकामी तव्द्तच याबाबतच्या, प्रती प्रत्येक पृष्ठास रु 2/- प्रमाणे विक्रिसाठी उपलब्ध करणेस तसेच महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी करणेकामी प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेपुढे सादर करणे कामी मान्यतेस्तव सादर.

ठरावाचा निर्णय :- सन 2024-2025 वित्तीय वर्षाचा सर्वसाधारण निधी, परिवहन समितीचा व विशेष निधी जमा व खर्च (दायीत्व) जमा खर्चास वार्षिक लेखे व सहपत्रे मान्य करुन ठरावाचे प्रतीसह महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी करणे व प्रस्तावित प्रमाणे विक्रिसाठी उपलब्ध करणेस प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार प, जि- पालघर, पि नं. ४०१३०३
दुरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. - 221८

विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:- 02/02/202८

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील विधी विभागाच्या कार्यालयीन कामकाजासाठी खटला व्यवस्थापन संगणक प्रणाली (Litigation Management System) तयार करुन अतिरिक्त २ वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती करणेकामी एजन्सी निश्चित करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना 03 जुलै 2009 रोजी 4 नगरपरिषदा व 53 ग्रामपंचायती मिळून झालेली आहे. भौगोलिक रचनेनुसार वसई-विरार हे शहर रेल्वेमार्ग व राज्य महामार्गाने प्रमुख शहरांना जोडलेले असून शहराच्या हद्दीत औद्योगिक संकुले अस्तित्वात आहेत. महानगरपालिकेची स्थापना झाल्यापासून शहराच्या हद्दीमध्ये झपाट्याने नागरीकीकरण झालेले असून वाढत्या नागरीकीकरणा सोबतच महानगरपालिका विरुद्ध विविध मा. न्यायालयात दाखल होणाऱ्या प्रकरणात देखील लक्षणीय वाढ झालेली आहे.

सदर मा. न्यायालयता दाखल होणाऱ्या खटले, दावे विरुद्ध विधी विषयक कामकाज हाताळण्यासाठी विधी विभाग कार्यरत आहे. तरी विधी विभागा मार्फत सदर प्रकारणेही म्यॅन्युअल पद्धतीने हाताळण्यात येत होती. परंतू विधी विभागाच्या कामकाजात अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होत होते. तरी सदर कामात अडथळे निर्माण होऊ नये व महानगरपालिकेच्या न्यायालय प्रकरणातील दाव्यांची संपुर्ण माहितीचे अभिलेख सुरक्षितरित्या जतन करणेकामी, दाव्यातील वेगवेगळे टप्प्यांचा मागोवा घेणे कामी, संबंधित अधिकारी/विधी सल्लागार/कर्मचारी/पॅनल वकिल यांचे दरम्यान दाव्याशी निगडीत संवाद, केलेल्या कामकाजाचे मुल्यामापन व त्यानुसार संबंधित अधिकारी/विधी सल्लागार/कर्मचारी/पॅनल वकिल यांचेवर जबाबदारी निश्चित करणे, गंभीर विषयांप्रकरणी अलीकडील तारखेपुर्वीच स्मरण करणेकामी, मागील अनुभवातून सर्वात्तम लाभ मिळणेकामी, दस्ताऐवज यांचे सोईस्कर व आर्थिकदृष्ट्या व्यवस्थापन करणेकामी व मासिक अहवाल (MIS Report) मिळणेकामी इत्यादी सर्व कामकाज सुरळीतपणे संगणक प्रणाली मार्फत होणेकामी या अनुषंगीक संगणक प्रणाली तयार करणेकामी विधी विभागाने माहे मार्च २०२२ मध्ये मागणी केलेली होती.

त्याअनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेची न्यायालयीन प्रकरणे हाताळणेकामी विधी विभागाकरीता खटला व्यवस्थापन संगणकीय प्रणाली तयार करणे कामी ई-निविदा प्रक्रियाद्वारे एजन्सी निश्चित करणेस संदर्भ क्र. १ च्या ठराव अन्वये मा. प्रशासक तथा आयुक्त सो यांनी मंजूरी दिली होती.

सदर मंजूरीच्या अनुषंगाने निविदा प्रसिद्ध करुन निविदेतील प्राप्त निविदाकार यांचे दर मंजूर करुन संविदा करणेकामी संदर्भ क्र. २ च्या ठरावा अन्वये दि. २०/०७/२०२२ रोजी मा. प्रशासक तथा आयुक्त सो यांनी मंजूरी दिली होती. त्यानुसार मंजूर निविदाकार मे. अश्व एंटरप्राईजेस यांनी जा.क्र.व.वि.श.म. /मातं/८९/२२-२३ दि.२२/०७/२०२२ रोजीच्या कार्यादेशा अन्वये संगणक प्रणाली तयार करुन महापालिकेत अंमलबजावणी केलेली होती. परंतू सदर निविदेचा कालावधी माहे जुलै २०२५ मध्ये संपुष्टात आलेला आहे.

तरी विधी विभागाच्या कामकाजामध्ये संगणक प्रणाली अभावी अडथळे निर्माण होऊ नये याकरिता पुनश्च: निविदा प्रक्रिया राबवून एजन्सी निश्चित करणे कामी संदर्भ क्र.३ अन्वये विधी विभागामार्फत दि.२९/१०/२०२५ रोजीची कार्यालयीन मागणी टिपणी प्राप्त झालेली आहे.

त्याअनुषंगाने पुनश्च: निविदा प्रक्रियाद्वारे एजन्सी नियुक्त करुन विधी विभागाकरीता खटला व्यवस्थापन संगणक प्रणाली (Litigation Management System) तयार करणे आवश्यक आहे. सदर संगणक प्रणाली मध्ये खालीलप्रमाणे वैशिष्टये आहेत.

१. महानगरपालिकेची सर्वच प्रलंबित व नवीन न्यायप्रविष्ठ प्रकरणे ही महानगरपालिकेच्या विविध विभागांमार्फत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने हाताळणी व सुरक्षितरीत्या जतन करुन ठेवता येतील.
२. दावे/दस्ताऐवज/कागदपत्र यांचे स्कॅनिंग सुरक्षितरीत्या जतन करता येतील,
३. संदेश सुविधा, प्रकरणातील संवाद सुविधा ज्यामुळे संबंधित विभागातील अधिकारी आणि विधी अधिकारी, विधी सल्लागार यांना दाव्याच्या अनुषंगाने अद्यावत ठेवता येतील.
४. दाव्यातील वेगवेगळ्या टप्प्यांचा मागोवा घेणे शक्य होईल.
५. केलेल्या कामकाजाचे मुल्यमापन व त्यानुसार संबंधित अधिकारी/कर्मचारी/विधी सल्लागार/वकीय यांचेवर जबाबदारी निश्चित करणे शक्य होईल.
६. MIS Report मासीक अहवाल हा न्यायालय-निहाय/दावा-निहाय/कार्यालय-निहाय प्राप्त होईल.

सदर संगणक प्रणाली तयार करुन अतिरिक्त २ वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती (AMC) करणेकामी येणारा अंदाजित खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

Sr. No	Item	Description of Activities/ Tasks To Be Undertaken	Cost (In Rupes)
१	Lms Web Application with ३ year Maintenance	Requirement Gathering Development of Web portal Based on, Testing, Data Migration, Search Engine Optimization, Creating Department Wise Logins and Assigns Rights to Update Accordingly Etc. Offsite System Engineers for support onsite Business Analyst for Call	१,६५,००,०००/-

२	Training and Implementing	Imparting Training to users, conducting Uat, Monitoring Data Updating and Implementation Up to Go Live	
३	Software support for ३ year	Support Cost For ३ Year:- Dedicated Onsite Site Resource for Support. १. Monthly Data Updating Analysis for Regular Updating of Website २. Statistical and Analytics reports for application	
		Total	१,६५,००,०००/-
		GST १८%	२९,७०,०००/-
		Total	१,९४,७०,०००/-

उपरोक्त प्रमाणे विधी विभागाकरीता खटला व्यवस्थापन संगणक प्रणाली (Litigation Management System) तयार करणेकामी अंदाजित रक्कम रु. १,९४,७०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च लेखासांकेतांक ९७३-४१७२ मा.त.वि. संगणक प्रणाली माहिती तंत्रज्ञान अनुषंगीक खर्च या लेखाशिर्षा अंतर्गत भागविता येईल.

तरी विधी विभागाकरीता खटला व्यवस्थापन संगणक प्रणाली (Litigation Management System) तयार करुन अतिरिक्त २ वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती करणेकामी ई-निविदा प्रक्रियाद्वारे Quality Cum Cost Based Selection (QCBS) पद्धती वापरुन एजन्सी निश्चित करणेस व सदरकामी होणाऱ्या अंदाजित रक्कम रु. १,९४,७०,०००/- (सर्व करांसहीत) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव पुढील ठराव करण्यात येत आहे.

<u>ठराव/निर्णय:-</u> विधी विभागाकरीता खटला व्यवस्थापन संगणक प्रणाली (Litigation Management System) तयार करुन अतिरिक्त २ वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती करणेकामी ई-निविदा प्रक्रियाद्वारे Quality Cum Cost Based Selection (QCBS) पद्धती वापरुन एजन्सी निश्चित करणेस व सदरकामी होणाऱ्या अंदाजित रक्कम रु. १,९४,७०,०००/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका